ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १५ फेब्रुवारी, १९५६ | अंक ७

## विविध माहिती

**अमेरिकन प्रवाशांचें आगमन**—भारतामधील प्रेक्षणीय स्थळें पहाण्यासाठी ३०० अमेरिकन नागरिकांचा एक गट आला होता. हे सर्व प्रवासी लक्षाधिपती होते. प्रवास करण्यासाठी त्यांनीं बऱ्याच खास विमानांचा उपयोग केला. त्याशिवाय सुखकर हवामान राखणाऱ्या दोन आगगाड्याहि त्यांच्या दिमतीला देण्यांत आल्या होत्या.

**आयुर्वेदाला उत्तेजन**—त्रावणकोर–कोचीन सरकारनें आयुर्वेदाला उत्तेजन देण्यासाठी एक आयुर्वेदीय कॉलेज आणि इस्पितळ काढण्याचें ठरविलें आहे. कॉलेज व इस्पितळ ह्यांच्या इमारतींसाठी १३ लाख रुपये खर्च येईल. त्यापैकीं १ लाख रुपये चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांतून देण्यांत येतील व बाकीची रकम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें मध्यवर्ती सरकारकडून मिळेल.

**इजिप्तला रशिअन विमानें**—इजिप्त–झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्यांत झालेल्या कराराला अनुसरून इजिप्तला रशिआकडून ४० बाँबफेकी विमानें व २५ लढाऊ विमानें मिळालीं आहेत, असें समजतें. इस्राइल येथील सर्वांत मोठें शहर तेलअवीव हें कैरापासून १५ मिनिटांच्या हवाई उड्डाणाच्या कक्षेंत आहे.

**लाकडापासून साखर तयार करणार**—जपानच्या संशोधकांनीं लाकडापासून साखर तयार करण्याचा शोध लावला असून ही साखर इतर पदार्थांपासून बनविलेल्या साखरेपेक्षा स्वस्त पडेल असा त्यांचा दावा आहे. साखर बनविण्याचा कारखाना एप्रिलपासून सुरू होइल आणि ऑगस्टमध्यें जपानमधील बाजारांत ती येईल. जपानमध्य आयात केल्या जाणाऱ्या साखरेपेक्षा ती २० टक्के स्वस्त असेल.

**प्रासादतुल्य शिशुगृह**—भारतामधील मुलांच्या कलात्मक व शास्त्रविषयक गुणांना उत्तेजन देण्यासाठी अलाहाबाद येथें एक प्रासादतुल्य शिशुगृह स्थापन करण्याचा विचार मध्यवर्ती सरकारचे मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं बोलून दाखविला. शिशुगृहांच्या इमारतींसाठी ५ लाख रुपये आणि त्यामधील साहित्यासाठी ३ लाख रुपये खर्च करण्यांत येईल. श्री. मालवीय रशिआला गेले असतां तेथील शिशुगृह पाहून त्यांना ही कल्पना सुचली.

**महारोग्यांसाठी आश्रम**—राजपिपला येथील लोकांनीं गांवांतील महारोग्यांना रहाण्यासाठीं आश्रम बांधण्याचें ठरविलें आहे. इमारत बांधण्यासाठीं वर्गणी जमा करण्याचें कार्य करण्यास एक कमिटी नियुक्त करण्यांत आली आहे. आश्रमासाठी १५,००० रुपये खर्च येईल.

**ग्वाल्हेर येथें नवे उद्योगधंदे**—राज्यपुनर्रचना समितीनें सुचविल्याप्रमाणें नवा मध्यप्रदेश अस्तित्वांत आल्यावर त्याची राजधानी भोपाळ येथें राहील. त्यामुळें ग्वाल्हेर येथें बेकारी वाढण्याचा संभव आहे. ह्या बेकारीवर उपाय म्हणून ग्वाल्हेरमधील उद्योगपतींनीं नव्या उद्योगधंद्यांच्या स्थापनेसाठी एक कॉर्पोरेशन काढावें, अशी सूचना भारतीय संरक्षणमंत्री डॉ. काटजू ह्यांनीं केली.

**हलक्या वजनाच्या मोटार सायकली**—पश्चिम बंगालमध्यें हलक्या वजनाच्या मोटार–सायकली तयार करण्याचा कारखाना जर्मनीच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. ह्या मोटार–सायकली वजनान इतक्या हलक्या असतील का त्या सहज उचलतां येतील. एक गॅलन पेट्रोलमध्यें त्या १०८ मैल अंतर जातील. ब्रिटनमध्यें ह्या ‘ मोपेड ’ गाड्यांची दरसाल ३०,००० पर्यंत विक्री होते.

**मुंबई राज्यांतील उन्हाळी झरे**—मुंबई राज्यांतील उन्हाळी झरे असणाऱ्या ठिकाणांची पहाणी करण्यासाठी सरकारनें एक कमिटी नेमली आहे. ह्या ठिकाणांत असलेल्या गंधकमिश्रित उष्ण पाण्याचा उपयोग करून घेण्यासाठी आरोग्यधामें बांधण्याचा सरकारचा विचार आहे. कमिटीचे अध्यक्ष म्हणून श्री. एस. एम्. डहाणूकर काम करणार आहेत. अहवाल सहा महिन्यांत सादर करण्यांत येणार आहे.

**तिबेटला जाण्यासाठी रस्ते**—तिबेट हा भूभाग आतांपर्यंत दुर्गम असा गणला जातो. पण तिबेटची राजधानी ल्हासा येथपर्यंत जाणारा एक रस्ता चीनचें सरकार बांधूं लागलें आहे. सध्या ल्हासाला जाणारा खेचरांचा मार्गच मोटारी जाण्याइतका रुंद करण्यांत येत आहे. भारतीय सरकारहि सिक्कीमची राजधानी गंगटोक येथून तिबेटच्या सरहद्दीपर्यंत मोटारीचा रस्ता तयार करीत आहे.

**पाकिस्तान रेल्वेचे डबे बांधणार**—पाकिस्तानला रेल्वेचे मालवाहू डबे परदेशांतून आणावे लागतात. पण आतां नॉर्थ वेस्टर्न रेल्वेनें मालवाहू डबे बांधण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. १९५६ सालांत २४१ बिनटपाचे आणि ९४ टपाचे डबे कारखान्यांत तयार करण्यांत येणार आहेत.

**बिहार सरकारचें कर्ज**—गंडक नदीवरील धरणाच्या योजनेसाठी लागणारा पैसा उभारण्यासाठी बिहार राज्य सरकारनें ५ कोटी रुपयांचें कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. व्याजाचा दर ४½% राहील. कीं गंडक–योजना–सर्टिफिकेटस ह्या नांवानें खास सर्टिफिकेटस् काढण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

**वीज-पुरवठ्याचें नवें केंद्र**—नांदेड व परभणी ह्या गांवांना विजेचा पुरवठा करणाऱ्या वीज-निर्मिती-केंद्राच्या पायाचा दगड नुकताच बसविण्यांत आला. केंद्राची उभारणी करण्यास सुमारें १३ लाख रुपयांचें भांडवल लागेल. पूर्णा नदीवर बांधण्यांत येणाऱ्या धरणासाठींहि ह्या केंद्रांतून विजेचा पुरवठा करण्यांत येईल. एकूण रकमेपैकीं एक लाख रुपये वीजवाहक तारांचें जाळें पसरण्यासाठीं खर्च होईल.

**भारत-रशिआ दर्यावर्दी वहातूक**—भारत व रशिआ ह्या दोन देशांच्या दरम्यान नियमितपणें दर्यावर्दी वहातूक सुरू करण्यांत आली आहे. रशिआच्या व्यापारी बोटी यापुढें भारताला नियमितपणें येणार आहेत. ओडेसा येथून 'स्टाव्हरोपाले' ही पहिली रशिअन बोट मुंबईला येण्यास निघाली आहे. ह्या बोटीनें भारतासाठीं चढविलेल्या मालांत इतर मालाबरोबर शेतीचीं अवजारेंहि आहेत.

**भारतामधील परदेशी विमा-कंपन्या**—भारतीय सरकारनें आयुर्विम्याच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण केल्यामुळें परदेशी कंपन्यांवर झालेल्या परिणामाविषयीं बोलणीं करण्यासाठीं ब्रिटनमधील एक प्रतिनिधीमंडळ भारतांत आलें आहे. भारतांत १७ परदेशी कंपन्या विम्याचा धंदा करीत होत्या. त्यांनीं १९५४ सालीं १६·१ कोटी रुपयांचे नवे विमे उतरविले. एकूण १३७ कोटी रुपयांचे विमे त्या कंपन्यांनीं दिलेलें आहेत.

**पाकिस्तानकडून गव्हाचें कर्ज**—अमृतसर तेथें भरलेल्या कॉंग्रेसच्या ६१ व्या अधिवेशनच्या निमित्तानें हजारों लोक अमृतसरला गेले होते. त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करण्यास मदत व्हावी म्हणून पाकिस्तान सरकारनें २,००० टन गहूं भारताला कर्जाऊ दिला आहे. मुंबई अगर इतर भागांतून गहूं आणण्यापेक्षा लाहोरहून तो आणणें फार सोयीचें होतें. अमृतसर-पासून लाहोर अवघें ३५ मैल लांब आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

सिंडिकेट म्हणजे ठेवींच्या भांडवलावर

☆ यशस्वी झालेला साखर कारखाना ☆

फेब्रुवारी व मार्च या दोन महिन्यांत

१०० टन उसाची १२० किंवा जास्त पोतीं साखर तयार होते.

सिंडिकेटचा साखरेचा उतारा हल्लीं १२ टक्के आहे.

—यामुळें—

दररोज १२०० पोतीं साखर तयार होते.

☆ वीस टक्के नफा आतां खात्रीचाच ☆

ठेवीच्या भांडवलाला

पुस्तकी पंडित "वाळूचा ढीग" अशीं नांवें ठेवतात

पण

उत्पादनाचें सिमेंटनें ठेवींचें कॉंक्रीट बनतें

हें पुस्तकी पंडितांना कळत नाहीं.

☆ १५ वर्षें ठेवी असलेले सिंडिकेटचे ठेवीदार आहेत. ☆

चालू युगांत इमारतींना कॉंक्रीट वापरतात.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ, पुणें २.
दि. ८-२-५६

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. १५ फेब्रुवारी, १९५६





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## जर्मनी पुनः समर्थ कसा झाला ?

### भारताला मार्गदर्शन

गेल्या सात–आठ वर्षांत पश्चिम जर्मनीनें जी आर्थिक प्रगति केली आहे, तिचें वर्णन 'अजब', 'आश्चर्यकारक', असें करण्यांत येत आहे. १९५० मध्यें जर्मनीचें वार्षिक उत्पादन ८९८० कोटी मार्क किंमतीचें होतें; १९५४ मध्यें तें १४,६०० कोटी मार्क एवढें झालें. म्हणजे, उत्पादनांत ६२% वाढ झाली. किंमतीचें मान लक्षांत घेतलें तर खरी वाढ ५०% झाली, असा हिशेब होतो. १९५५ मधील पहिल्या सहामाहीच्या अनुभवावरून, ह्या वर्षांतील उत्पादन १५,३०० कोटी मार्क इतकें झालें असलें पाहिजे. भांडवली गुंतवणुकीचें एकूण मिळकतीशीं प्रमाण १९५४ मध्यें २४·४% पडलें; जिनसांच्या उपभोगांत ज्या मानानें वाढ होत गेली, त्यापेक्षा अधिक गतीनें बचत व गुंतवणूक होत गेली; निर्गत व्यापारहि अशीच वाढ दाखवीत होता. त्याबरोबरच, रोजगार करणारांची संख्याहि वाढली. १९५५ चे मध्याचे सुमारास, जर्मनींत बेकारीचा प्रश्न मुळींच उरला नाहीं.

१९५१ पासून पुढें आयातीपेक्षा निर्गत अधिक होत गेली. सतत चार वर्षें हा वाढावा अनुभवास आल्याकारणानें, बँक डॉयश्चर लांडेर ह्या मध्यवर्ती बँकेकडे ऑक्टोबर, १९५५ अखेर १२४० कोटी डॉलर्सची हुंडणावळ–गंगाजळी सांठली. म्हणजे, सहा महिन्यांच्या आयातीच्या किंमतीइतकी ती गंगाजळी झाली. त्यापैकीं ७६% गंगाजळी सोन्याच्या व डॉलर्सच्या स्वरूपांत होती. जर्मन मार्कची क्रयशक्ति कायम ठेवून ही सर्व प्रगति साधलेली आहे; तीन वर्षांपूर्वी रहाणीच्या खर्चाचा इंडेक्स नंबर जितका होता, तितकाच तो आजहि कायम आहे.

मध्यवर्ती सरकार, राज्य सरकारें, म्युनिसिपालिट्या, इत्यादींचीं अंदाजपत्रकें वाढावा दाखवीत आलीं आहेत. तीं सर्व आणि रेल्वेज, पोस्ट ऑफिसें, इत्यादींनीं बँक खात्यांत १,१४० कोटी मार्क ठेवले आहेत. त्या सर्वांचें मिळून देणें कर्ज फक्त ३,२८० कोटी रुपये आहे. राष्ट्रीय उत्पन्नांत भर पडत गेल्या कारणानें, करभार कमी करूनहि सर्वांची आर्थिक स्थिति सुधारली. एकाद्यानें १९४९ सालीं कांहीं प्रातिनिधिक शेअर्स खरेदी केले असले व ते त्यानें सप्टेंबर, १९५५ मध्यें विकून टाकले, तर त्याला खरेदी किंमतीच्या आठ पट रक्कम हातीं आली असेल, ही एकच गोष्ट जर्मनीच्या पुनरुद्धाराची कल्पना पुरेशी आणून देईल.

युद्धसमाप्तीनंतरच्या काळांत जर्मनीमध्यें बॉंबवर्षाव, पाडापाड, गोंधळ, इत्यादींत चलनविषयक दुःस्थितीची भर पडली होती. उत्पादक कार्यापेक्षा काळ्या बाजारांतील व्यवहार अधिक नफ्याचे झाले होते. उत्पादन कमी, त्यामुळें बेकारी ज्यास्त. पूर्वेकडून आलेल्या निर्वासितांच्या लोंढ्यामुळें अडचणी वाढलेल्या. जुलै, १९४८ मध्यें करण्यांत आलेल्या चलनी सुधारणांमुळें मात्र ही घसरगुंडी थांबली. त्या संबंधांतील धोरणें अशीं होतीं:—

( १ ) सरकारी नियंत्रणांच्या २० वर्षांच्या अंमलांतून खासगी उपक्रमांची मुक्तता.

( २ ) बचतीस व भांडवलनिर्मितीस भरपूर प्रोत्साहन. रहाणीचा दर्जा कनिष्ठ होता, त्यामुळें विशेष प्रोत्साहन आवश्यक होतें.

( ३ ) बिऱ्हाडांची सोय; कोळसा–लोखंड–पोलाद–वीज ह्यांचा वाढता पुरवठा.

( ४ ) बाजारभाव वाढणार नाहींत, ह्यादृष्टीनें घेतलेली दक्षता.

( ५ ) निर्यातीस उत्तेजन. त्यामुळें आवश्यक अन्न व कच्चा माल ह्यांची आयात शक्य झाली व परदेशी हुंडणावळीची गंगाजळी सांठली.

हीं सर्व धोरणें यशस्वी होण्यास एक महत्त्वाची मनोवृत्ति साहाय्यभूत झाली. आर्थिक परिस्थितींत सत्वर सुधारणा घडून यावयाची असेल, तर अत्यंत कष्ट करणें आवश्यक आहे ह्याची सामान्य जनतेंत झालेली तर्कशुद्ध जाणीव.

चलन व नाणेंविषयक सुधारणेबरोबरच एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट जर्मन व विदेशी अर्थशास्त्रज्ञांच्या सल्ल्याविरुद्ध करण्यांत आली; ती म्हणजे एका हुकुमाच्या फटकाऱ्यानें रेशनिंग व किंमतीवरील नियंत्रणें दूर केलीं गेलीं. लोक तात्काळ उत्पादक कामाकडे वळले, काळाबाजार आपोआप बंद पडला. कारखान्यांतील गैरहजेरी कमी झाली व उत्पादन वाढलें. ज्यास्त काम केलें तर जास्त उत्पन्न मिळून त्याचा उपभोगहि हवा तसा घेतां येईल, ह्या जाणीवेनें उद्योगपती व कामगार ह्यांच्यांत उत्साह निर्माण झाला.

करांत बरीच घट करण्यांत आली. काम करण्यास प्रोत्साहन मिळावें, बचत करण्यास व ती गुंतविण्यास लोकांनीं प्रवृत्त व्हावें, ह्या दृष्टीनें करपद्धति सुधारण्यांत आली. उदाहरणार्थ, उत्पन्नाचा जो भाग गुंतविण्यांत येईल, त्यावर कराची माफी देण्यांत आली. रात्रपाळींत आणि रविवारीं व सुटीच्या दिवशीं केलेलें काम ह्यासाठीं मिळालेल्या जादा मोबदल्यावर कर रद्द केला. जादा काम करण्यास कामगार खुषीनें तयार होऊं लागले.

ह्या सर्व गोष्टी झाल्या तरी भांडवल पुरेसें उपलब्ध होण्यावरच बरेंच अवलंबून होतें. बँक कर्जावर ८% व ओव्हरड्राफ्टवर ९½% दरानें व्याज आकारलें जाई; आतां तो दर हळूहळू उतरूं लागला असून अनुक्रमें ६% व ७% वर आला आहे.

'मार्शल एड' योजनेनें कांहीं भांडवलाचा पुरवठा झाला, तरी देशांतील भांडवलाचा झराच अखेर उपयोगी पडणार हें उघड आहे. १९५० मध्यें १,२६० कोटी मार्क इतकें भांडवल उभारलें गेलें; १९५४ मध्यें तें २,७५० कोटी मार्क इतकें झालें; म्हणजे त्यांत १२०% वाढ झाली. खाजगी व्यक्तींच्या बचतींत २०९% वाढ दिसून आली, हेंच त्याचें प्रमुख कारण होय. कारखान्यांना पैशाची चणचण कमी भासली, कारण कामगारांनीं आपल्या मागण्या मर्यादेंत राखल्या व त्यामुळें नफा वाढला; घसाऱ्याला बऱ्याच मोठ्या प्रमाणांत कराची माफी देण्यांत आली आणि डिव्हिडंडच्या रूपानें नफा वाटून न टाकता तो धंद्यांतच शक्य तो गुंतवला गेला.

डिव्हिडंड वरील भारी कर आणि डिबेंचर्सनें भांडवल उभारण्यां-

तील अडचणी, ह्यांमुळें कारखान्यांना बँकांकडून पैसे घ्यावे लागले. बँकांच्या कर्जातूनच कारखान्यांतील बरीच यंत्रसामुग्री उभारण्यांत आलेली आहे. १९४९ ते १९५५ ह्या मुदतींत बँकांनीं कारखान्यांना दिलेल्या कर्जांत पांच पट वाढ झाली. बँकांकडे त्याचप्रमाणांत ठेवी जमा होत गेल्यामुळें चलनवाढीचा दुष्परिणाम घडून आला नाहीं. तथापि, ठेवींची अल्प मुदत आणि कर्जाची दीर्घकालीन परतफेड, ह्या कारणानें बँकांच्या ताळेबंदांतील 'तरतेपणा' कमी होत गेला. ह्यापूर्वीहि जर्मनीमध्यें, ब्रिटिश बँकांइतका तरत्या गुंतवणुकीवर कधींच भर देण्यांत आलेला नव्हता.

देशांतील आर्थिक परिस्थिति आटोक्यांत ठेवण्याचें काम मध्यवर्ती केंद्रीय बँकेनें मोठ्या तत्परतेनें केलें. चलनवाढ करून बेकारीस आळा घालण्याचें धोरण तिनें पत्करलें नाहीं; जर्मन मार्क ह्या चलनाची किंमत स्थिर राखणें; हें तिनें आपलें श्रेष्ठ कर्तव्य ठरवलें होतें. कोरियन युद्धामुळें किंमती वाढूं लागतांच, केंद्रीय बँकेनें कडक उपाययोजना केली. १ ऑक्टोबर १९५० रोजीं, सभासद्–बँकांनीं राखावयाच्या रिझर्व्हची मर्यादा ५०% नें वाढविली, २६ ऑक्टोबर १९५० रोजीं डिस्कौंट रेट ६% केला, नंतर सभासद्–बँकांना द्यावयाचीं कर्जें १०% नें कमी केलीं व तेवढ्यानें भागलें नाहीं म्हणून सभासद्–बँकांनीं थोड्याच महिन्यांत स्वतः दिलेल्या कर्जांत १०० कोटी मार्कची घट घडवून आणावी, असें फर्माविलें. १९५२ नंतर किंमतींची पातळी स्थिर राहिली आहे. 'ओपन मार्केट ऑपरेशन्स' हीं त्यासाठी आवश्यक त्या रोख्यांच्या अभावीं अशक्य होतीं; त्याचबरोबर निर्यातींतील वाढाव्यामुळें बँकांना अधिकाधिक चलन पुरवावें लागत होतें. अशा अडचणींतहि मध्यवर्ती बँकेनें आर्थिक तारू शिताफीनें हांकलें.

निमसरकारी व खासगी संस्थांनीं मोठ्या रकमा जमा करून केंद्रीय बँकेकडे सुपूर्त केल्या, त्यामुळें जादा निर्गतीचे चलनविषयक दुष्परिणाम टळण्यास मदत झाली. कामगार संघांनीं वेतनवाढीचा तगादा केला नाहीं, त्यामुळें उत्पादनखर्च वाढत गेला नाहीं. निर्गत-वाढीस कामगारांची ही वृत्ति विशेष उपकारक ठरली. ग्रेटब्रिटनमध्यें उत्पादनवाढीच्या गतीपेक्षा वेतनवाढीची गति अधिक होती, तर जर्मनींत उत्पादनवाढीची गति जास्त होती.

"१९४२ चे मानानें प्रत्येकजणच आतां अधिक चांगल्या स्थितींत आहे. एकूण उत्पादन वाढविणें, हें जर्मनीचें प्रथमश्रेणीचें उद्दिष्ट होतें. कांहींना त्यांत अप्रमाण वाटा मिळाला असला, तरी प्रत्येकाचाच वाटा वाढलेला आहे आणि इतर मार्गांनीं सुद्धां ह्याप्रमाणेंच एकूण भाज्य वाढला असता, असें सांगतां येणार नाहीं." असें उत्तर "सामाजिक न्यायाच्या आजच्या कल्पनांशीं जर्मनीचें धोरण विसंगत होतें" ह्या टीकेस देण्यांत येत आहे.

१९५५ मध्यें जर्मनीच्या आर्थिक प्रगतीस थोडी आडकाठी निर्माण झाली. निर्गतीमधील वाढाव्यांत घट, कांहीं जिनसांच्या, विशेषतः कच्च्या मालाच्या किंमतींत वाढ, उत्पादनांत थोडा खंड, कामगारांच्या वेतनाविषयीं मागण्यांत वाढ, हीं त्या आडकाठीचीं कारणें होत. विशेषतः वेतनवाढीच्या मागण्यांचें स्वरूप जास्त त्रासदायक आहे. सरकारनें व केंद्रीय बँकेनें अर्थातच उपाययोजना सुरू केली आहे. शस्त्रीकरणास गति प्राप्त झाली, म्हणजे दारुगोळ्याच्या कारखान्यांत आणखी कामगार लागतील, त्यामुळें त्यांच्या मागण्याहि वाढत जातील, असें दिसतें. दर माणशीं दर ताशीं उत्पादन ह्यामुळें कदाचित वाढत जाणार नाहीं. दारूगोळ्याच्या कारखान्यांना ज्यास्त भांडवल लागेल. त्यामुळें इतर कारखान्यांना त्याचा तुटवडा भासूं लागेल. सरकारच्या केंद्रीय बँकेंतील शिलका दारुगोळ्यांच्या उत्पादनासाठी वापरण्यांत येऊं लागल्या, त्याचाहि ताण भासूं लागेल. शस्त्रीकरणामुळें निर्गतींत घट झाली तर आवश्यक आयातहि अवघड होईल. राष्ट्रीय उत्पादनांतील वाढीच्या मर्यादेंत शस्त्रीकरण राहिलें, तर रहाणीच्या मानावर त्याचा प्रतिकूल परिणाम होणार नाहीं. जर्मन राष्ट्रानें आजवर कितीतरी संकटांना तोंड दिलेलें आहे. तेव्हां त्याच्या प्रगतीबद्दल "आशादायक शंका" कोणी बाळगली, तरी ती खोटीच ठरेल.

झूरिच विद्यापीठांतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. फ्रेडरिक लुट्झ ह्यांनीं लॉइड्स बँक रिव्ह्यूच्या ताज्या अंकांत जर्मनीच्या आर्थिक पुनरुद्धाराची चिकित्सा केली आहे, तिच्याच आधारें हा आढावा येथें देण्यांत आला आहे. प. जर्मनीचे डेप्युटी प्राइम मिनिस्टर डॉ. फ्रान्झ ब्लुइचर ह्यांनीं भारताला नुकतीच भेट दिली आणि श्री. नेहरू ह्या वर्षअखेर प. जर्मनीला भेट देणार आहेत. प. जर्मनी व भारत ह्या दोघांनीं, राजकीय दृष्ट्या, महायुद्धानंतर साधारण एकाच वेळीं पुनर्रचनेला प्रारंभ केला. जर्मनीशीं युद्ध बंद केल्याची घोषणा सर्व देशांपैकी भारतानें प्रथम केली होती. भारतानें आंतरराष्ट्रीय संबंधांत बरेंच वरचें स्थान प्राप्त केलें आहे, तर प. जर्मनी राजकीय दृष्ट्या खची झाला तरी त्यानें आर्थिक बाबतींत प्रचंड प्रगति घडवून आणली आहे. भारताला यंत्रसामुग्री पुरविणाऱ्या देशांत जर्मनीचा तिसरा अनुक्रम लागत आहे. रूरकेला पोलाद कारखान्यास प. जर्मनीचें तांत्रिक साह्य, क्रुप कारखानदाराची भारतास भेट, इत्यादि गोष्टी भारत–जर्मन सहकार्याचीं प्रतीकें आहेत. भारताची दुसरी पंचवार्षिक योजना आतां जाहीर झाली आहे. ह्या सर्व दृष्टींनीं, प. जर्मनीच्या आर्थिक उद्धाराचें रहस्य आपणांस बोधप्रद वाटेल.

## पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेस १९५५ मध्यें ७४ लक्ष रु. नफा झाला. १९५४ मधील नफ्यापेक्षा तो १७ लाखांनीं ज्यास्त आहे. १९५४ मध्यें ठेवींत १० कोटींची वाढ झाली, तर १९५५ मध्यें त्यांत १४ कोटींची भर पडून आतां ठेवींची रक्कम ९० कोटी रुपये झाली आहे. १९५५ मध्यें बँकेनें १४ आणखी कचेऱ्या उघडून त्यांची संख्या ३२६ वर आणली.

## रूरल क्रेडिट रिपोर्टाची छोटी आवृत्ति

ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीच्या रिपोर्टाचा संक्षेप करून त्याच्या छापील प्रती रिझर्व्ह बँकेनें विक्रीसाठी काढल्या आहेत. प्रत्येक प्रतीची किंमत २ रुपये आहे.

## कंपन्यांच्या रजिस्ट्रार्सना अर्थमंत्र्यांचें मार्गदर्शन

लिमिटेड कंपन्यांच्या रजिस्ट्रारांची एक बैठक दिल्ली येथें भरविण्यांत आली होती, ती तीन दिवस चालली. बैठकींत बोलतांना अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं सांगितलें, कीं हिंदी आर्थिक क्षेत्राच्या खाजगी विभागाचा कारभार कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीवर अवलंबून रहाणार आहे. ज्यांना वकील, अकौंटंट किंवा तज्ज्ञ ह्यांच्या सल्ल्याचा फायदा घेतां आला नाहीं अशांना अधिकाऱ्यांनीं मार्गदर्शन करावें. कायद्याचें जाणून बुजून उल्लंघन केलेलें असेल, तरच त्यावर कडक उपाययोजना करावी; चुकून कायदा मोडला गेला असेल, तर त्याकडे सहानुभूतीनें पहावें.

## अमेरिकन नागरिकांचें उत्पन्न व खर्च

अमेरिका हा एक मोठा संपन्न देश आहे, तेथील लोक भरभराटींत आहेत, इतकीच कल्पना सामान्यतः जगास प्रचलित आहे. ह्या समृद्धीची किंवा अधिक कांटेकोरपणानें बोलावयाचें झाल्यास अमेरिकन नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीविषयीं नीटशी कल्पना असत नाहीं. तथापि, त्यांच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या आंकड्यांवरून ह्याविषयीं थोडीबहुत कल्पना येण्यासारखी आहे. १९५४ सालीं अमेरिकन कुटुंबाचें किमान सरासरी उत्पन्न सुमारें ५,२५७ डॉलर्स होतें अशी माहिती फेडरल रिझर्व्ह बोर्डानें दिली आहे. १९५१ सालाशीं तुलना करतां हें उत्पन्न ६३३·५८ डॉलर्सनें अधिक आहे. साधारणपणें ४ माणसांचें एक कुटुंब असा हिशोब आहे. अमेरिकेंतील प्राथमिक शिक्षक, दुय्यम शिक्षक, सुपरवायझर्स, सुपरिंटेंडेंट्स, ह्यांच्या वार्षिक पगाराची सरासरी १९५४–५५ सालीं ४,१५२ डॉलर्स होता. टंकलेखकाला दर आठवड्याला सरासरी ५२·८० ते ६८·६४ डॉलर्स वेतन मिळतें. विमा-एजंटाला दरसाल ३,१६७ डॉलर्स मिळतात. यंत्रज्ञाला दरसाल ७,३५८ डॉलर्स मिळतात. रोज लागणाऱ्या कांहीं प्रमुख जिनसांच्या किंमती अशा आहेत. १ पौंड पाव २० सेंटस्, १ पौंड लोणी ७६ सेंटस्, १२ अंडीं ६४ सेंटस्, ताजीं केळीं १ पौंड १६ सेंटस्, बटाटे १० पौंडांला ७३ सेंटस्, साखर १ पौंडाला १० सेंटस्, तांदूळ १ पौंडाला २० सेंटस्, टॉवेल १·०६ डॉलर्स, लोकरीचें ब्लँकेट १४·५२ डॉलर्स, कामाची सुती विजार ३·८४ डॉलर्स, कामाचा शर्ट १·५८ डॉलर्स, ४ खोल्यांच्या घरांच्या किंमती निरनिराळ्या शहरांत वेगवेगळ्या आहेत. बॉस्टन ९,४२३ डॉलर्स, पिटसबर्ग ९,८७२ डॉलर्स, वॉशिंग्टन ११,६०८ डॉलर्स व सॅनफ्रॅन्सिस्को ९,९८४ डॉलर्स. ( एक डॉलर = १०० सेंट्स = ४ रु. ८ आ )

## उच्च तांत्रिक शिक्षण देणारी संस्था

भारताची औद्योगिक प्रगति साधण्यासाठी तंत्रज्ञ शिकवून तयार करण्याची आवश्यकता आतां सर्वमान्य झालेली आहे. तथापि, उच्च तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था भारतांत पुरेशा नाहींत. अर्थातच, आधुनिक तंत्रविज्ञानांत पुढारलेल्या राष्ट्रांच्या मदतीनें असें शिक्षण देणाऱ्या संस्था काढणें जरूरीचें झालें आहे. रशिआच्या मदतीनें मुंबई येथ अशा प्रकारची एक संस्था १९५७ सालच्या मध्याच्या सुमारास स्थापन करण्यांत येणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शैक्षणिक व शास्त्रीय उपसंघटनेमार्फत रशिआ जरूर ती मदत देण्यास तयार आहे. ह्या संस्थेमध्यें दरसाल १,००० विद्यार्थी उच्च तंत्रविज्ञानाचें शिक्षण घेऊं शकतील. संस्थेला लागणारें शैक्षणिक साहित्य रशिआ पुरविणार आहे. तथापि, त्याची पैशांत किंमत अजून नक्की झालेली नाहीं. तेरापण सुमारें ६० लाख रूबल किंमतीचीं उपकरणें व इतर साहित्य रशिआकडून मिळेल असा अंदाज आहे. त्या शिवाय प्रत्यक्ष शिक्षकाचें काम करण्यासाठी १५ प्राध्यापक ५ वर्षांच्या मुदतीनें भारतांत पाठविण्यांत येतील. निरनिराळ्या विषयांवरील रशिअन भाषेंतील तांत्रिक ज्ञानाचीं पुस्तकें इंग्रजींत भाषांतर करून घ्यावीं लागतील. ह्या कामासाठी तीन भाषांतरकारहि येणार आहेत. त्यांच्याकडून संस्थेला लागणारीं पाठ्यपुस्तकें तयार करविण्यांत येतील. भारतीय सरकारनें अशा प्रकारच्या चार संस्था देशांत स्थापन करण्याचं ठरविलें आहे. पूर्व भारतासाठी पहिली संस्था १९५१ सालीं खरगपूर येथें स्थापन करण्यांत आली. मुंबईला उभारण्यांत येणारी ही दुसरी संस्था पश्चिम भारतासाठी आहे. दक्षिण व उत्तर भारतासाठीं आणखी दोन संस्था दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत उघडल्या जातील.

## दिल्लींतील काबीळ आटोक्यांत आणण्यासाठीं अमेरिकेची दक्षता

दिल्ली राज्यांत काविळीचा फैलाव झाला, त्यावेळीं अमेरिकन सरकारनें तांतडीनें ४७·५ लक्ष रुपये किंमतीचें ५४·७५ मण वजनाचें गॅमा ग्लोब्युलिन हें औषध मोफत पुरविलें. काविळीवर प्रतिबंधक उपाय म्हणून ह्या अँटीबॉडीजनीं युक्त अशा ब्लड प्लॅझ्माचा उपयोग करण्यांत आला. वल्लभभाई पटेल चेस्ट इन्स्टिट्यूटमध्यें हें औषध शीतपेटींत ठेवण्यांत आलें असून तेथून तें दररोज जरूरीप्रमाणें दवाखान्यांना वांटण्यांत येतें. भारत सरकारनें दिल्लीमधील अमेरिकन वकिलास पत्र पाठवून आभार मानले आहेत.

## रशियांत कालिदासाचा स्मृतिदिन

कालिदासाचा स्मृतिदिन येत्या मे महिन्यांत रशियामध्यें साजरा केला जाईल. कालिदासाच्या वाङ्मयाचें प्रदर्शन व वाचन त्यावेळीं होईल.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

दि
बँक ऑफ महाराष्ट्र लि.
शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

भांडवल

वसूल भांडवल रु. १६,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड रु. ७,७५,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ५,५०,००,०००चे वर

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
★ हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना-पुणें, सोलापूर (फलटण गल्ली शाखा), नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, किर्लोस्करवाडी व पनवेल येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची सोय आहे.
★ महाराष्ट्र एक्झिक्यूटर अँड ट्रस्टी कं. लि. ही व्यवस्थापत्र, विश्वस्तपत्र वगैरेंचीं कामें करते.

मुख्य कचेरी:- चिं. वि. जोग,
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. मॅनेजर.

## पंचांगांत सुधारणा

भारतांत मुलकी व्यवहारासाठीं वापरावयाच्या एकच एक समान पंचांगांत 'शक' कालगणनेचा उपयोग करण्याची शिफारस पंचांग सुधारणा समितीनें केली आहे. या समितीचा अहवाल शास्त्रीय व औद्योगिक संशोधन-मंडळानें नुकताच प्रसिद्ध केला आहे.

सर्व देशभर पंचांगविषयक गणितांसाठीं खगोल ज्योतिषि सामान्यतः शक वर्षाचा उपयोग करतांना आढळतात. १९५४ इ. स. म्हणजे १८७५-७६ शक येतो.

समितीनें नेहमींचें वर्ष ३६५ दिवसांचें असावें असें सुचविलें असून वाढ वर्ष (लीप इयर) ३६६ दिवसांचें राहील. शकाच्या संख्येंत ७८ मिळवून येणाऱ्या संख्येला चारांनीं भाग जात असेल तर तें वर्ष वाढ वर्ष समजण्यांत येईल.

तसेंच वर्षाचा प्रारंभ चैत्र महिन्यापासून व्हावा असें समितीनें सुचविलें आहे. वाढ वर्ष सोडल्यास हा महिना ३० दिवसांचा राहील. वाढ वर्षीं त्याचे ३१ दिवस राहतील.

नव्या भारतीय पंचांगांत महिन्याच्या प्रारंभाचे दिनांक सध्यांच्या ग्रेगेरियन कॅलेंडरांतील ठराविक दिनांकासच पडतील. ते असेः—चैत्र (वाढ-वर्ष सोडून ३० दिवसांचा) महिन्याचा प्रारंभ वाढ-वर्ष सोडून नेहमीं २२ मार्च रोजीं होईल. वाढ वर्षीं तो २१ मार्चला सुरू होईल. वैशाख (३१ दिवस) २१ एप्रिल रोजीं, ज्येष्ठ (३१ दिवस) २२ मे रोजीं, आषाढ (३१ दिवस) २२ जून रोजीं, श्रावण (३१ दिवस) २३ जुलै रोजीं, भाद्रपद (३१ दिवस) २३ ऑगस्ट रोजीं, आश्विन (३० दिवस) २३ सप्टेंबर रोजीं, कार्तिक (३० दिवस) २३ ऑक्टोबर रोजीं आग्रहायण (३० दिवस) २२ नोव्हेंबर रोजीं, पौष (३० दिवस) २२ डिसेंबर रोजीं, माघ (३० दिवस) २१ जानेवारी रोजीं आणि फाल्गुन (३० दिवस) २० फेब्रुवारी रोजीं.

शास्त्रीय औद्योगिक संशोधन मंडळानें नोव्हेंबर १९५२ मध्यें या समितीची नेमणूक केली होती. समितींत पुढील सात सदस्य होते.:—प्रा. मेघनाद सहा, एफ्. आर. एस्. (अध्यक्ष), प्रा. ए. सी. बानर्जी, अलाहाबाद विद्यापीठाचे उपकुलगुरु, डॉ के. एल्. दप्तरी नागपूर, श्री. ज. स. करंदीकर 'केसरी'चे माजी संपादक, पुणें, प्रा. आर. व्ही. वैद्य उज्जैन, डॉ. गोरख प्रसाद, अलाहाबाद आणि श्री. एन्. सी. लाहिरी, कलकत्ता.

ब्रिटिश सत्ता १७५७ मध्यें भारतांत बद्धमूल होऊं लागली तेव्हांपासून भारतांत ग्रेगेरियन कॅलेंडर वापरांत आहे. हें कॅलेंडर जगांत मोठ्या प्रमाणांत प्रचारांत असून भारतांतहि सरकारी कामासाठीं तेंच वापरलें जातें. तथापि, भारतानें याहून अधिक शास्त्रीय अस जागतिक कॅलेंडर मुलकी तसेंच कारभारात्मक उपयोगांसाठीं सुरू करण्याची सूचना यूनोंत मांडली आहे.

---

**भारत सेवक समाजाचें कार्य**—पुढील पांच वर्षांत भारत सेवक समाज ही विधायक कामें करणारी संघटना लोकांचें सहकार्य मिळवून ५० कोटी रुपयांचीं सरकारी कामें पार पाडणार आहे. विशेष तांत्रिक ज्ञान न लागणारीं कामेंच संघटना अंगावर घेणार आहे. मजुरांच्या सहकारी संघटना काढून त्यांच्या करवीं कामें करवून घेण्यांत येणार आहेत.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

राष्ट्रीय बचत योजना

व्याज ३ टक्के

माहितीसाठीं लिहा अगर भेटा

मुख्य ऑफीस: सारस्वत बँक बिल्डींग, मुंबई ४.

शाखा: फोर्ट, दादर, माहीम, बेळगांव, पुणें

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[शेड्यूल्ड बँक]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर:

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. १-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एल्‌एल्. बी., चेअरमन

शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेले

किर्लोस्कर

बैलांनी व पॉवरवर चालणारे

उसाचे चरक


आपल्या पसंतीनुरूप आणि गरजेप्रमाणें योग्य चरकाची निवड करा.

सविस्तर माहिती आजच मागवा.

• शरद

• कोयना

• वसंत



किर्लोस्कर बंधु. लि.

किर्लोस्करवाडी द. सातारा.

## लवादबोर्डावरील प्रतिनिधींच्या मुशाहिऱ्याची तरतूद

लेखक : श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., पुणें

मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या १९२५ च्या कायद्यान्वयें कलम ५४ यांत नमूद केलेल्या लवाददाव्यांचा निर्णय होणेसाठी अशा स्वरूपाचे दावे रजिष्ट्रार्स नॉमिनीकडे पाठविले जातात. कानू ३२ अन्वयें संबंधी पक्षकारांना नोटिसा आलेवर लवाद बोर्डाची मागणी न आल्यास रजिष्ट्रार्स नॉमिनी दाव्यांचा निर्णय करतात, ज्यावेळीं संबंधीं पक्षकार लवाद-बोर्डाची मागणी करून दाव्याचा निर्णय लवाद बोर्डाकडून करून घ्यावयाची इच्छा प्रदर्शित करतात त्यावेळीं लवाद बोर्डावरील सदस्यांना त्यांच्या कामाचा मुशाहिरा द्यावा लागतो. लवादबोर्डावरील प्रतिनिधींना त्यांच्या कामाबाबत किती मुशाहिरा द्यावयाचा याचा निर्णयासंबंधीं पक्षकार स्वतःशीं ठरवून त्याप्रमाणें तो देणेची जबाबदारी स्वतःवर घेतात. रजिष्ट्रार्स नॉमिनीच्या कामाची फी सदरचे कायद्याखालील कानून्वयें ठरविलेली आहे. लवादबोर्डावर पक्षकारांचे प्रतिनिधींना त्यांचे कामाबाबत किती मुशाहिरा द्यावयाचा याबाबत सदरचे कायद्यांत अगर त्याखालील कानूंत तरतूद केलेली नाहीं. संबंधीं पक्षकार व त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे दरम्यान कामाचे मुशाहिऱ्याबाबत जो करार ठरेल त्यावर ह्या रकमेचा आंकडा अवलंबून असतो. प्रतिनिधीनें सांगितलेली रक्कम पक्षकारानें देणेचें कबूल केल्यास प्रतिनिधी काम करणेस तयार होतो. दाव्याचा निर्णय झालेवर लवादबोर्डाचे अध्यक्षांनीं म्हणजे रजिष्ट्रार्स नॉमिनीनें कामाबाबत किती फी घ्यावयाची ह्याचें स्केल दिलेलें असलेमुळें त्यांत नमूद केलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम त्यांस मिळत नाहीं. साधारण स्वरूपाच्या लवाददाव्यांत ही रक्कम रुपये दोन पासून तीस रुपयांपर्यंत असूं शकते. कायदेशीर गुंतागुंतीचे व दीर्घ मुदतीपर्यंत चाललेल्या लवाददाव्याचे कामीं मे. असिस्टंट रजिष्ट्रार्स को. सोसायटीज यांनीं मान्यता दिल्यास लवाद बोर्डाचे अध्यक्षांस ५० रुपयांपर्यंत फी मागणेची व मिळणेची तरतूद सदरचे कायद्यांत आहे. परंतु लवाद बोर्डावरील पक्षकारांचे प्रतिनिधींना मुशाहिरा म्हणून किती रक्कम द्यावी याचें निर्णायक स्केल सदरचे कायद्यांत नाहीं. कायदेशीर गुंतागुंतीचे व दीर्घ-मुदतीपर्यंत चालणाऱ्या लवाद दाव्यांत थोड्या खर्चांत योग्य व लायक प्रतिनिधी लवादबोर्डावर संबंधी पक्षकारांस मिळत नाहीं व त्यामुळें पक्षकारांची अडचण होते; व योग्य व लायक प्रतिनिधी मिळेपावेतों लवाददाव्याचें काम दिरंगाईवर पडतें. एखाद्या पक्षकारानें लवादबोर्डावर काम करणेसाठी सहकारी सोसायट्यांच्या कायद्याची पूर्ण माहिती असणारा असा नामवंत प्रतिनिधी पाठवल्यास दुसऱ्या बाजूकडील पक्षकारास तितक्याच तोलाचा व अभ्यासू प्रतिनिधी थोड्या खर्चांत मिळणें कठीण होतें व त्यामुळें अशा पक्षकाराची लवाद-न्यायालयांत कुचंबणा होते. ज्या लवाद दाव्यांत सहकारी संस्था पक्षकार असतात अशा संस्थांच्या बाबत ही अडचण प्रामुख्यानें येते. लायक व योग्य प्रतिनिधी लवाद बोर्डावर पाठवावयाचा झाल्यास त्यास त्याच्या योग्यतेच्या व मेहनतीच्या मानानें बरीच रक्कम दिल्याशिवाय योग्य प्रतिनिधी मिळत नाहीं; व योग्य व हुशार प्रतिनिधी लवादबोर्डावर न पाठविल्यास लवाद दाव्यांत अपयश येणेचाहि संभव असतो.

लवादबोर्डाकडून दाव्याचा निर्णय झालेवर लवाद दाव्याची फी म्हणजे रजिष्ट्रार्स नॉमिनीची फी व खर्च ही दाव्याचे निर्णयाप्रमाणें योग्य त्या पक्षकारांवर टाकलेली असते व हुकुम-नाम्यांत निर्दिष्ट केलेप्रमाणें संबंधी पक्षकारांकडून ती वसूलहि करतां येते. लवादबोर्डानें केलेल्या दाव्यांच्या हुकुमनाम्यांत प्रतिनिधींना दिलेल्या रकमेची जबाबदारी ब्रहंशीं ज्या पक्षकारांनीं प्रतिनिधि दिला असेल त्यावरच टाकण्यांत आलेली असते. त्यामुळें लवाददाव्यांत यश मिळूनहि विजयी पक्षकारांस प्रतिनिधीचा खर्च मिळत नाहीं. सहकारी संस्थांमार्फत लवाद-बोर्डावर जे प्रतिनिधी काम करतात त्यांना द्यावी लागणारी रक्कम त्या संस्थानांच सोसावी लागते; व त्यामुळें अशा सहकारी संस्थांना अशा रकमांचा भूर्दंड सोसावा लागतो. त्यामुळें सहकारी संस्थांच्या सांपत्तिक परिस्थितीवर त्याचा थोडाबहुत प्रतिकूल परिणाम होतो. सहकारी संस्थांच्या सध्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितींत ह्या प्रश्नाचा सांगोपांग विचार होणें जरूरीचें झालें आहे.

---

### ४६ कस्टोडिअन्सची नेमणूक

मध्यवर्ती सरकारनें भारतांतील वेगवेगळ्या आयुर्विमा कंपन्यांसाठी एकूण ४६ कस्टोडिअन्सची नेमणूक केली आहे. त्यांपैकी मुंबई शहरांत १३, दिल्ली शहरांत ६, आग्रा-अमृतसर-कानपूर-अजमीरमध्यें ५, कलकत्त्यांत १५ व मद्रासमध्यें ७ आहेत. वेस्टर्न इंडियाचे कस्टोडिअन श्री. एम्. व्ही. सोहोनी (पूर्वीचे बॉंबे म्युच्युअलचे मॅनेजर) हे असून, श्री. के. व्ही. जोशी, (पूर्वीचे वेस्टर्न इंडियाचे मॅनेजर) ह्यांच्याकडे पुण्याच्या कॉमनवेल्थ, ट्रस्ट ऑफ इंडिया व औंध म्युच्युअल ह्या कंपन्या आहेत.

---

**नव्या बोटी मिळविण्यासाठी रक्कम**—भारतीय सरकारच्या वहातूक खात्यानें दर्यावर्दी वहातुकीच्या नव्या बोटी मिळविण्यासाठी नियोजन समितीकडे ८० कोटी रुपयांची मागणी केली होती. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत ह्या कामासाठी ५० कोटी रुपयेच नियोजन समितीनें मंजूर केले होते. आतां ह्या रकमेंत आणखी ५ कोटींची कपात करण्यांत आली आहे.

**बिहार राज्याचा पंचवार्षिक कार्यक्रम**—बिहार राज्य सरकारनें आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमावर ६४३ कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें होतें. परंतु भारतीय सरकारच्या योजनासमितीनें राज्य सरकारच्या कार्यक्रमाप्रमाणें खर्च करण्यांत येणारी रक्कम जास्तींत जास्त २०४ कोटी रुपयांची असावी असा निर्णय घेतला आहे.

तमाम दंतरोगांवर
☆ नागछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

पोस्ट बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८३

पुणें जिल्ह्यांतील सर्व जनतेच्या विश्वासास पात्र झालेली ही सहकारी मध्यवर्ती बँक असून गेलीं आठ वर्षें आपले भागीदारांस ६ टक्के डिव्हिडंड देत आहे. भागविक्री चालू आहे. बँकेचे मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची सोय आहे. पुणें शहरांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय प्रथमतः आपल्या बँकेनेंच सुरूं केली. जिल्ह्यांत सर्व तालुक्याचे ठिकाणीं बँकेच्या शाखा असून त्यांचे मार्फत बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. बँकेची सर्वांगीण प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

(१) दिनांक ३०–६–५५ अखेर
भागांचें वसूल भांडवल रु. ८,३२,०००
(२) गंगाजळी व इतर फंडस् रु. ७,९६,०००
(३) एकूण ठेवी रु. १,६७,००,०००चे वर
(४) एकूण खेळतें भांडवल रु. १,९१,१७,०००चे वर

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९३४ ]

मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.
शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
अ. मॅनेजर.



## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —
सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,००,००० |

—यच्चयावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन
श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. कें. पां. जोशी (अध्यक्ष) श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
*मॅनेजिंग डायरेक्टर.*


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.